# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
# १७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info E__mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


क्र.परिपत्रक/२०२५/१७९७७८७ दिनांक- २६-०४-२०२५

प्रति,
प्राचार्य/प्राचार्या
सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य,विज्ञान,
शिक्षणशास्त्र व शारिरीक शि क्षणशास्त्र महाविद्यालये,
पुणे,अहिल्यानगर,नाशिक

**विषय:- अशासकीय महाविद्यालयामध्ये कायम विनाअनुदानित विभागातून अनुदानित विभागाकडे केलेल्या नियमबाहय नेमणुकांबाबत..**

संदर्भ:- १.शासन पत्र क्र. HTED-E-Comp-१०६०२५४/२०२५-MHT-(HE-५) दि.१७-०४-२०२५
२.मा.संचालनालयाचे पत्र क्र.अशाम/२०२५/Comp No.१५९६५६५/अनुवि .अनु/कोवि/ मवि-२ दि.१८-०४-२०२५
३.मा.संचालनालयाचे पत्र क्र.अशाम/२०२५/Comp No.१५९६५६५/अनुवि .अनु/कोवि/ मवि-२ दि.२४-०४-२०२५

उपरोक्त विषयाच्या संदर्भात कळविण्यात येते की, राज्यातील काही अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कायम विनाअनुदानित विभागाकडून अनुदानित विभागात बदलीसाठी मान्यता देण्यात आली असल्याचे तसेच सदरहू कर्मचाऱ्यांचे नाव सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करुन वेतन आहरित करण्यात आले असल्याचे निदर्शनास आल्याने अशा स्वरुपाच्या समान प्रकरणांमध्ये वित्तीय व प्रशासकीय अनियमितता आहे का, यांची तपासणी करणेबाबत उक्त संदर्भीय पत्रान्वये निर्देश प्राप्त झालेले आहेत.

अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता ( शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी करीता अटी शर्ती) नियम १९८४ मधील नियम ४ मध्ये अशासकीय सलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नियुक्ती करण्याकरीता प्रक्रिया विहीत करण्यात आलेली आहे. अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करताना प्रमाण संहितेतील नियम ४ मधील निकषांचे पालन करणे, शिक्षकेतर कर्मचारी पदभरतीकरीता शासनाची मान्यता असणे आणि संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडुन नाहरकत प्रमाणपत्र

घेणे, आरक्षण नियमांचे पालन करणे, विहीत पध्दतीने जाहिरात देणे तसेच कर्मचाऱ्यांची निवड विहीत पध्दतीने गठीत निवड समीती मार्फतच करणे आवश्यक आहे.

शासन परिपत्रक दि.२६-०८-२०२१ अन्वये शासनाने अकृषि विद्यापीठांशी संलग्नित मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षकेतर पदांच्या पदभरतीबाबत व नियुक्तीबाबत पुन:श्च सविस्तर कार्यपध्दती विषद केलेली आहे. तसेच सदर परिपत्रकातील मुद्दा क्र.ई नुसार विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित पदावर नियुक्त झालेल्या/ कार्यरत असलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्याची बदली अनुदानित पदावर करण्यात येऊ नये असे स्पष्ट करण्यात आले आहे.

शासन निर्णय, वित्त विभाग दि.०२-०६-२०१५ व दि.१५-०१-२०१६ अन्वये पदभरतीवर निर्बंध घालण्यात आलेले आहेत. या शासन निर्णयानंतर अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीस शासन मान्यता देण्यात आलेली नाही.

शासनाने विहित केलेल्या व प्रचलित असलेल्या कार्यपध्दतीचा म्हणजेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयात पदभरतीकरीता शासनाची मान्यता नसताना आणि पदभरतीसाठी सहसंचालकांचे ना-हरकत प्रमाणपत्र नसताना तसेच विहित प्राधिकरणामार्फत प्रमाणित केलेल्या बिंदुनामावलीचा वापर न करता अशासकीय कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयातुन/विभागातुन /पदावरुन अनुदानित महाविद्यालयात/विभागात/ पदावर बदलीने नियुक्ती देणे व संबंधित कर्मचाऱ्यांचा समावेश एचटीई सेवार्थ प्रणालीत करणे हि बाब शासनाच्या धोरणांच्या/नियमांच्या विरुध्द ठरते.

तरी, प्रस्तुत प्रकरणी संदर्भाधित शासन पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार या विभागातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये वित्त विभागाच्या शासन निर्णय दि.०२-०६-२०१५ व शासन निर्णय दि.१५-०१-२०१६ नंतर शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदभरतीस मान्यता दिलेली नसताना शासनाने विहीत केलेली व उपरोक्त नमूद केलेली प्रक्रिया न करता कायम विना अनुदानित/विना अनुदानित महाविद्यालयातील/ विभागातील/पदावरील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना बदलीने अनुदानित महाविद्यालयात/विभागात/पदावर नियुक्त्यांची तपासणी करावयाची आहे.

या अनुषंगाने या विभागातील अशा प्रकरणांची तपासणी करणेबाबत कार्यशाळा आयोजित करण्यात येत असुन आपल्या महाविद्यालयातील अशा कर्मचाऱ्यांची माहिती सोबतच्या विवरणपत्रांमध्ये Microsoft excel sheet **(Font name- Sakal Marathi, Font Size-११)** मध्ये तयार करण्यात यावी व त्याची Excel Soft copy व Hard copy खालील नमुद वेळ व ठिकाणी माहितगार कर्मचारी मार्फत सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी. याबाबतचे विवरणपत्रे सोबत सलग्न् केलेले असुन सदर विवरणपत्रामध्ये (Microsoft excel sheet) मध्ये १ ते ४० मुद्यांची माहिती भरावयाची असुन यामध्ये माहिती भरताना कोणत्या बाबी विचारात घ्यावयाच्या आहेत याबाबतच्या सविस्तर सुचना विवरणपत्र-ब मध्ये देण्यात आलेल्या आहेत. विवरणपत्र-ब मधील सुचनांनुसार १ ते ४० मुद्यांची माहिती भरण्यात यावी. त्याचप्रमाणे वेतन पथकाकडुन वेतनात नाव समाविष्ट केले, त्या आदेशाच्या प्रती, वेतन पथकाकडुन नाव समाविष्ट करताना नोंदविलेले अभिप्राय, तसेच दरमहा वेतन देयकात बदल झाल्याबाबत Change Statement विवरणपत्राच्या नोंदी याबाबतचा तपशिल सोबत सादर करवा.

तसेच सदर माहितीसोबत संबंधितांचे मुळ सेवापुस्तकासह विवरणपत्रामध्ये नमुद कागदपत्रांच्या मुळ प्रत व प्राचार्यांनी साक्षांकीत केलेल्या कागदपत्रांची एक प्रत सादर करावी. तसेच सदरची माहिती अचूक असलेबाबत व यामध्ये तफावत आढल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील असे प्रमाणपत्र सोबत सादर करावे.

तरी वरील सूचना विचारात घेऊन सोबतच्या विवरणत्रांधील माहितीसह खालील नमूद केलेल्या ठिकाणी, तारखांना व वेळेत उपस्थित राहावे.

| अ.क्र | जिल्हयाचे नाव | दिनांक व वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१ | पुणे शहर | दि.०५-०५-२०२५ वेळ- स.१०.०० वा. | नौरासजी वाडीया महाविद्यालय, पुणे |
| ०२ | नाशिक | दि. ०६-०५-२०२५ वेळ- स.१०.०० वा | |
| ०३ | अहिल्यानगर | दि. ०७-०५-२०२५ वेळ- स.१०.०० वा | |
| ०४ | पुणे ग्रामीण | दि. ०८-०५-२०२५ वेळ- स.१०.०० वा | |

**Signed by Ashok Uddhav Ubale**
**Date: 26-04-2025 19:56:09**

( डॉ.अशोक उबाळे )
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे-१

| | | | | |
|---|---|---|---|---|
| संस्थेचे नाव व पत्ता | | | | |
| महाविद्यालयाचे नाव व पत्ता | | | | |
| अ.क्र. | दि.१.१०.२०१७ रोजी अनुज्ञेय शिक्षकेतर पदे | दि.१.१०.२०१७ रोजी भरलेली पदे | दि.१.१०.२०१७ रोजी रिक्त पदे | |
| | | | | |
| | | | | |

अनुज्ञेय पदांचा तपशील:-

| अ.क्र. | पदनाम | दि.१.१०.२०१७ रोजी अनुज्ञेय शिक्षकेतर पदे | दि.१.१०.२०१७ रोजी भरलेली पदे | दि.१.१०.२०१७ रोजी रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | प्रबंधक | | | |
| २ | अधिक्षक | | | |
| ३ | मुख्य लिपीक | | | |
| ४ | वरिष्ठ लिपीक | | | |
| ५ | कनिष्ठ लिपीक | | | |
| ६ | ग्रंथालय लिपीक | | | |
| ७ | सहाय्यक ग्रंथपाल | | | |
| ८ | लघुलेखक (वरिष्ठ/कनिष्ठ) | | | |
| ९ | प्रयोगशाळा सहाय्यक | | | |
| १० | प्रयोगशाळा परिचर | | | |
| ११ | ग्रंथालय परिचर | | | |
| १२ | शिपाई | | | |
| | एकूण | | | |

# (विवरण पत्र-अ)

अनुज्ञेय पदांवरील कार्यरत कर्मचाऱ्यांचा तपशील:-

| अ.क्र | महाविद्यालयाचे नाव | संस्थेचे नाव | कर्मचाऱ्याचे नाव | जन्म दिनांक | सध्याचे पदनाम | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

| कर्मचाऱ्याचा जातीचा प्रवर्ग व प्रत्यक्ष नियुक्तीचा प्रवर्ग | | शैक्षणिक अर्हता तपशील | | | | तांत्रिक अर्हता तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्मचाऱ्याचा जातीचा प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | अर्हता | मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण महिना / वर्ष | प्राप्त टक्के | अर्हता | मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण महिना / वर्ष | प्राप्त टक्के |
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| | | इ.४ थी | | | | संगणक अर्हता | | | |
| | | इ.९ वी | | | | मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. | | | |
| | | इ.१० वी | | | | इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि. | | | |
| | | इ.१२ वी | | | | इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. | | | |
| | | पदवी | | | | ग्रंथालय प्रशिक्षण प्रमाणपत्र (एल.टी.सी.) | | | |
| | | पदव्युत्तर पदवी | | | | ग्रंथालय पदविका | | | |
| | | इतर | | | | ग्रंथालय पदवी | | | |
| | | | | | | लघुलेखन मराठी १००/ १२० श.प्र.मि. | | | |
| | | | | | | लघुलेखन इंग्रजी १००/ १२० श.प्र.मि. | | | |
| | | | | | | इतर | | | |

| संबंधित कर्मचाऱ्याच्या नियुक्तीपुर्वी बिंदूनामावलीची तपासणी केली आहे काय? असल्यास, तपशील सादर करावा. | संबंधिित कर्मचाऱ्याच्या नियुक्तीपुर्वी पदभरतीसाठी सह संचालक / संचालक (उच्च शिक्षण) यांचे ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) घेतले आहे काय? असल्यास, तपशील सादर करावा. | पदभरतीच्या जाहिरातीचा दिनांक (विनाअनुदानित / अनुदानित जाहिरातीचा दिनांक स्वतंत्रपणे नमुद करावा) |
|---|---|---|
| १८ | १९ | २० |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

| जाहिरातीमध्ये नमुद जातीचा प्रवर्ग | निवड समितीच्या बैठकीचा दिनांक | निवड प्रक्रिया प्रमाण संहिता, १९८४ मधील तरतूदीनुसार आहे / नाही. | प्रथम नियुक्तीचे पदनाम | मूळ / प्रथम पदावर रुजू झाल्याचा दिनांक | प्रथम नियुक्ती आदेश दिनांक | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | विनाअनुदानित | कायम विनाअनुदानित |
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| व स्वरुप | विनाअनुदानित विभाग अनुदानित झालेला आहे / नाही. | विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालय / विद्याशाखा / अभ्यासक्रम शाखेतून अनुदानित पदावर बदलीने रुजू झाल्याचा दिनांक व पदनाम | परिविक्षाधीन कालावधीसाठी नियुक्ती देण्यात आली असल्यास, सेवेत कायम करण्यात आल्याचा दिनांक | सर्वप्रथम अनुदानित पदावरील वेतन सह संचालक कार्यालयाकडून आहरीत केल्याचा दिनांक | एचटीई सेवार्थ प्रणालीत नाव समाविष्ट केल्याचा दिनांक | एचटीई सेवार्थ प्रणाली मध्ये एकत्रित समावेश झाल्यानंतर, नव्याने सेवार्थ प्रणालीत नाव झाल्यास त्याचा तपशील | नियमित पदोन्नतीचा तपशील | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुदानित | | | | | | | पदोन्नतीचे पद | पदोन्नती समिती बैठक दिनांक | पदोन्नतीचा दिनांक |
| २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३६ | ३७ |
| | | | | | | | १ | | |
| | | | | | | | २ | | |
| | | | | | | | ३ | | |
| | | | | | | | ४ | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

| सेवानिवृत्ती दिनांक | निवड झालेल्या कर्मचाऱ्याची नियुक्ती, निवड कार्यपध्दतीच्या सर्व निकषांचे पालन करुन झाली किंवा कसे? | विहीत कार्यपध्दतीने निवड झालेली नसल्यास, अनियमितता झालेल्या बाबीचा तपशील |
|---|---|---|
| ३८ | ३९ | ४० |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

## (विवरण पत्र-ब)

**अशासकीय महाविद्यालयामध्ये कायम विनाअनुदानित विभागातून अनुदानित विभागाकडे केलेल्या नियमबाहय नेमणूका तपासणीसाठी तयार करण्यात आलेल्या विवरणपत्रात बिनचूक माहिती सादर करण्यासाठीचे निर्देश :-**

| अ.क्र. | विवरणपत्रातील रकाना क्र. | तपशील | निर्देश |
|---|---|---|---|
| १. | ४. | कर्मचाऱ्याचे नाव | संबंधित महाविद्यालयात अशासकीय अनुदानित पदावर कार्यरत असलेले व एचटीई सेवार्थ प्रणालीत वेतन आहरीत होत असलेल्या सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सेवा विषयक तपशील मूळ सेवापुस्तक, निवड नस्ती व सेवार्थ प्रणालीत नोंदविलेली माहितीवरुन तपासणे. |
| २. | १८ | बिंदूनामावली | व्यवस्थापन / महाविद्यालयाचे संबंधित पदाची बिंदूनामावली प्रत्यक्ष पाहणी करुन, सदर बिंदूनामावली संबंधित कर्मचाऱ्याच्या नियुक्तीपूर्वी प्रमाणित केलेली असल्याची खात्री करुन नमुद करावी. |
| ३. | १९ | ना-हरकत प्रमाणपत्र | शासनमान्य अनुदानित पदासाठी शासन निर्णय, वित्त विभाग दि.२.६.२०१५ व दि.१५.१.२०१६ अन्वये पदभरतीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. या कालावधीनंतर ना-हरकत प्रमाणपत्र न घेता पदभरती झाली किंवा कसे, ही बाब तपासणे. |
| ४. | २० | जाहिरात | संबंधित कर्मचाऱ्याच्या नियुक्तीवेळी देण्यात आलेल्या जाहिरातीचा प्रत्यक्ष मसूदा तपासून, विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित नमुद करणे. |
| ५. | २३ | निवड प्रक्रिया | प्रमाण संहिता, १९८४ मधील तरतूदीनुसार विहीत निवड समिती असल्याची निवड समिती अहवाल तपासून नमुद करणे. |
| ६. | २६ ते २८ | प्रथम नियुक्ती आदेश दिनांक व स्वरुप | जाहिरातीत नमुद केल्यानुसार नियुक्तीचे स्वरुप व आदेश असल्याची खात्री करणे तसेच विहीत नमुन्यातील नियुक्ती आदेश असल्याची खात्री करणे (जाहिरातीचा संदर्भ, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | नियुक्ती कालावधी, नियुक्ती स्वरुप, वेतनश्रेणी, वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र, नियुक्तीच्या अटी-शर्ती इ.) |
| ७. | २९ | विनाअनुदानित विभाग अनुदानित झाल्याबाबत | दि.२४.११.२००१ पुर्वी विनाअनुदान तत्वावर व त्यानंतर टप्पा अनुदान सूत्रानुसार अनुदानित झाल्याबाबत शासन आदेश तपासून नमुद करणे. |
| ८. | ३० | विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालय / विद्याशाखा / अभ्यासक्रम शाखेतून अनुदानित पदावर बदलीबाबत | विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित विभागातून अनुदानित विभागाकडे बदली केली असल्यास त्याबाबतचे सर्व अभिलेखांची तपासणी करुन अचूक माहिती नोंदविण्यात यावी. |
| ९. | ३२ | अनुदानित पदावरील वेतन अदायगीबाबत | संबंधित कर्मचाऱ्याचे अनुदानित पदावरील वेतन प्रत्यक्षात ज्या दिनांकापासून सुरु करण्यात आले त्याचा अचूक तपशील नोंदविण्यात यावा. |
| १०. | ३३ | एचटीई सेवार्थ प्रणालीत नाव समावेशन | एचटीई सेवार्थ प्रणालीत कोणत्या महिन्यापासून वेतन सुरु करण्यात आले तो महिना नमुद करावा. |
| ११. | ३४ | एकत्रित समावेश झाल्यानंतर, नव्याने सेवार्थ प्रणालीत | एचटीई सेवार्थ प्रणाली धोरण करतेवेळी ज्या कर्मचाऱ्यांचा एचटीई सेवार्थ प्रणालीत समावेश करण्यात आलेला आहे, त्या दिनांकानंतर नव्याने विभागीय सहसंचालक कार्यालयाच्या स्तरावर एचटीई सेवार्थ प्रणालीत समावेश झाला असल्यास वेतन पटाच्या बदल विवरणपत्र (Change Statement) च्या आधारे नमुद करावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | ३५-३७ | नियमित पदोन्नतीचा तपशील | मूळ नियुक्ती विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित पदावर मात्र पुढील पदोन्नतीसाठी आवश्यक असणारा सेवा/अनुभव विचारात घेऊन अनुदानित पदोन्नतीच्या पदावर, पदोन्नती दर्शविली किंवा कसे, याबाबत खात्री करावी. |
| १३. | ३९ | निवड कार्यपध्दती निकषाचे पालन | पदभरतीसाठी बिंदूनामावली, विभागीय सहसंचालकांचे ना-हरकत प्रमाणपत्र, जाहिरात, निवड समिती अहवाल, नियुक्ती आदेश, वेतन निश्चिती व वेतननिश्चितीची पडताळणी, या प्रक्रियेनंतर एचटीई सेवार्थ प्रणालीत वेतनासाठी समावेश झाला किंवा कसे, या बाबी तपासणे. |
| १४. | ४० | निवड कार्यपध्दतीत झालेल्या अनियमिततेबाबत | उक्त कार्यपध्दतीतील अनुपालन न झालेली निश्चित बाब नमुद करुन स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवावेत. |
| १५. | | | |